दि. 23/01/2023

1) पुढारी पान क्र. 3

# वसई-विरार महानगरपालिका निवडणुकीसाठी तारीख पे तारीख

वसई : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील महापालिका निवडणुकांचं भवितव्य निश्चित करणारी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भातील सुनावणी आता तीन आठवड्यांनी लांबणीवर गेली आहे. आता ही सुनावणी पुढच्या महिन्यात म्हणजेच, फेब्रुवारी महिन्यात पार पडणार आहे. सुनावणीसाठी सुप्रीम कोर्टाच्या कामकाजात हे प्रकरण लिस्ट करण्यात आलं होतं. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या फेब्रुवारीतील संभाव्य निवडणुकीवर पाणी सोडले गेले आहे.

गेल्या अडीच वर्षांपासून वसई-विरार शहर महापालिका निवडणुकीमागे एकप्रकारचे शुक्लकाष्टच लागले आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असलेले ओबिसी आरक्षणाचा राजकीय मुद्दा, प्रभागरचना यावर अडलेले घोडे पुढे जायलाच तयार नाही. वारंवार निवडणूक पुढे ढकलली जात असल्याने इच्छूकांची मात्र गोची झाली आहे.

दरम्यान, २० जून २०२० सालीच वसई-विरार शहर महानगरपालिकेची मुदत संपली आहे. गेल्या अडीच वर्षात या निवडणुकांना मुहूर्त सापडत नसल्याने इच्छूक व सर्वसामान्य नागरिकदेखील हवालदिल झाले आहेत. प्रशासकीय राजवटीत वसई-विरार शहर महपालिकेतील विकासकामे मार्गी लागलेली नाहीत. दरम्यान, महापालिका निवडणुकांच्या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी फेब्रुवारी महिन्यात सुनावणी करण्यास सांगितलं आहे. महापालिका निवडणुका नेमक्या कधी होणार याचं उत्तर या सुनावणीवर अवलंबून आहे. ९२ नगरपरिषदांमध्ये ओबीसी आरक्षणाचा मुद्दाही याच याचिकेत समाविष्ट आहे. गेल्या बर्याच काळापासून हे प्रकरण सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे.

वसई-विरार शहर महापालिका निवडणुकीसंदर्भातील सुनावणी गेल्या काही महिन्यांपासून सातत्यानं लांबणीवर जात आहे. या प्रकरणावरील शेवटचा निर्णय सुप्रीम कोर्टानं यापूर्वी २८ जुलै २०२२ रोजी दिला होता. याच सुनावणीत सुप्रीम कोर्टानं ओबीसींच्या राजकीय आरक्षणाला परवानगी देण्यात आली होती. पण, त्यानंतर ९२ नगरपरिषदांचा प्रश्न कोर्टात प्रलंबित होता. त्यानंतर राज्यात सत्तांतर झालं. नवं सरकार स्थापन झाल्यानंतर ४ ऑगस्ट २०२२ रोजी निवडणुका आणि प्रभाग रचना यासंदर्भातील नवा अध्यादेश काढण्यात आला, त्यानंतर हा मुद्दा सुप्रीम कोर्टात पोहोचला आहे. याप्रकरणी डिसेंबरमध्ये शेवटची सुनावणी पार पडली होती. त्यावेळी सुप्रीम कोर्टानं हे प्रकरण १७ जानेवारी २०२३ रोजी प्राधान्यानं ऐकलं जाईल, असं सांगितलं होतं. मात्र ही सुनावणी झाली नाही. घटनापीठाचं कामकाज खूप लांबल्यामुळे या सुनावणीवर त्याचा परिणाम दिसून आला. त्यानंतर आज या प्रकरणाचा कोर्टाच्या कामकाजात समावेश करण्यात आला, त्यानंतर या प्रकरणाची सुनावणी फेब्रुवारी महिन्यात घेतली जाईल, असं सांगण्यात आले.

## शिंदे-फडणवीस सरकारमुळे निवडणुका पुन्हा लांबणीवर

मे महिन्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची सूचना केली होती. कुठल्याही परिस्थितीत निवडणुका घ्या, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं होतं. परंतु त्यानंतर राज्यात सत्तांतर झालं आणि शिंदे-फडणवीस सरकारने वॉर्ड रचना पुन्हा नव्याने करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे निवडणुका पुन्हा लांबणीवर पडल्या. शिंदे सरकारने २०१७ प्रमाणे चारचा प्रभाग करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला महाविकास आघाडीने जोरदार विरोध केला होता. याच धर्तीवर महानगरपालिकेची निवडणूकदेखील रखडली आहे. बदलणाऱ्या निर्णयांमुळे निवडणूक लांबत गेली आहे.

2) पुढारी पू. पान क्र. 1

# नालासोपाऱ्यात वीज चोरीप्रकरणी कारवाई

मिरारोड : नालासोपारा परिसरात दोन ठिकाणी वीज चोरी करून वापरणाऱ्या चाळीस जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वसई , विरार, नालासोपारा परिसरात वीज चोरी होत असल्याच्या तक्रारी होत्या. त्यातील नालासोपारा भागातील प्रगती नगर, ओसवाल नगरी, सेंट्रल पार्क परिसरात सप्टेंबर ते नोव्हेंबर २०२२ या तीन महिन्यांच्या काळात अनेक जण महावितरण कंपनीची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे वीज वापरत असल्याचे निदर्शनास आले. त्या परिसरात २९ जणांनी १८१२१ युनिटचा वापर करून ३ लाख ९ हजार १६० ची वीजचोरी केली होती. तर त्याच परिसरात १६ जून २०२२ रोजी २१ जणांनी अनधिकृतपणे २१८७९ युनिट वीजेचा वापर करून ३ लाख ६३ हजार ९५० रुपयांचे महावितरण कंपनीचे आर्थिक नुकसान केले होते. हे प्रकार उघडकीस येताच महावितरण कंपनीकडून तुळींज पोलिस ठाण्यात ४० जणांवर वीज चोरी प्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत.

CamScanner
CamScanner

३) पुढारी पु. पान क्र. १

दि. 23/01/2023

# रिकॅलिब्रेशन दंड रद्द न केल्यास २५ जानेवारीला रिक्षा बेमुदत बंद

**वसई : पुढारी वृत्तसेवा**




मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण विभागाचे सचिव यांनी १६ जानेवारीपासून मीटर रिकॅलिब्रेशन करता पन्नास रुपये प्रतिदिन व परवाना निलंबन तथा जास्तीत जास्त पाच हजार रुपयाची दंडात्मक कारवाई करण्याचे लेखी आदेश केले आहेत. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वसई क्षेत्रात शेअर प्रमाणे रिक्षा भाडे आकारले जाते. तसेच पालघर जिल्ह्यातील सर्व भाडे शअर रिक्षा प्रमाणे यापूर्वीच मंजूर करण्यात आले. तसेच २३ रुपये प्रमाणे दरवाढ अद्यापही लागू करण्यात आलेली नाही. संपूर्ण पालघर जिल्ह्यात भाडे यापूर्वी निश्चित केले आहे. त्यामुळे येथे रीकॅलिब्रेशन करण्याची तातडीची गरज नाही. या सर्व बाबींचा विचार करून मिटर री कॅलिब्रेशन वर सुरू केलेला दंड तात्काळ रद्द करावा, अशी मागणी ऑटो रिक्षा टॅक्सी चालक मालक महासंघाच्या तातडीच्या झालेल्या सभेमध्ये करण्यात आली आहे.

प्रशासनाने या संदर्भातली कोणतीही पूर्वकल्पना व सूचना येथील रिक्षा संघटनांना दिलेल्या नव्हत्या. या निर्णयाबाबत १६ जानेवारी २०२३ रोजी समाज माध्यमातून सर्व संघटनांना माहिती मिळाली हा दंड अत्यंत चुकीचा व अन्यायकारक आहे. तरी रीकॅलिब्रेशन बाबत आकारण्यात आलेली दंडात्मक कारवाई तात्काळ थांबवून ज्या ठिकाणी शेअर रिक्षा दर प्रणाली सुरू आहे. त्या ठिकाणी मार्चपर्यंत मुदतवाढ द्यावी. मिटर री कॅलिब्रेशनवर सुरू केलेला दंड तात्काळ रद्द करावा. अशी मागणी ऑटो रिक्षा टॅक्सी संघटनेने केली आहे.

४) सामना पान क्र. १२

# दिल्ली पोलीस लवकरच दाखल करणार आरोपपत्र




**तीन हजार पानांचे आरोपपत्र**

## १०० हून अधिक साक्षीदारांचे जबाब आणि फॉरेन्सिक पुराव्यांचा समावेश

मुंबई, दि. २२ (प्रतिनिधी) - बहुचर्चित श्रद्धा वालकर हत्या प्रकरणी दिल्ली पोलिसांनी आरोपपत्राचा मसुदा तयार केला असून लवकरच ते आरोपपत्र दाखल करण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले. त्या आरोपपत्रात १०० हून अधिक साक्षीदारांचे जबाब, इलेक्ट्रॉनिक, फॉरेन्सिक व परिस्थितीजन्य पुराव्यांचा समावेश आहे. शिवाय त्यात आरोपी आफताब पुनावाला याचा कबुली जबाब आणि नार्को तपासणीचा अहवाल देखील आहे.

मूळची वसईची असलेली श्रद्धा वालकर ही दिल्ली येथे आफताब पुनावाला याच्यासोबत लिव्ह इनमध्ये राहत होती. प्रियकर असलेल्या आफताबने तिची निर्घृण हत्या करून तिच्या शरीराचे असंख्य तुकडे केले आणि त्यानंतर निर्दयी नराधमाने त्या शरीराच्या तुकड्यांची विल्हेवाट लावली होती. हा प्रकार उघडकिस आल्यानंतर संपूर्ण देशात खळबळ उडाली होती. दिल्ली पोलिसांनी तपास सुरू करून आफताबच्या मुसक्या आवळल्या होत्या. दरम्यान, प्रजासत्ताक दिनानंतर कधीही अंतिम दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले जाईल, असेही सूत्रांकडून सांगण्यात आले.

CamScanner

5) लोकमत पृ: पान क्र. 3

दि. 23/01/2023

# मीरा-भाईंदरला गुंडांचा बोलबाला

## राजकीय पक्षांसोबत ऊठबस : हद्दपारीचा प्रश्न येतो कुठे?

**धीरज परब**

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा - भाईंदरमध्ये तडीपारीची कारवाई करण्यास पोलिसच धजावत नाहीत. त्यामुळे राजकीय गुंडांचा हैदोस सुरूच आहे. त्यांच्यावर साधी प्रतिबंधात्मक कारवाई करायचे म्हटले तरी पोलिसांना अनेकदा विचार करावा लागतो. २०२२ या वर्षात केवळ पाच जणांना हद्दपार केले आहे. त्यात एकही राजकीय गुंड नाही.

गुन्हेगारीचे राजकीयीकरण झाले आहे. राजकीय पक्षांच्या आड हे गुंड वा गुन्हेगारी प्रवृत्ती असणारे उजळ माथ्याने पोलिसांच्या आणि प्रशासनाच्या मांडीला मांडी लावून उठबस करत आहेत. मीरा - भाईंदरमध्ये पूर्वी गुंडगिरी, हल्ले, हत्या व्हायच्या तशी आता परिस्थिती नाही.

राजकीय गुंडांच्या सांगण्यावरून पोलिस विरोधकांवर तत्काळ कारवाई करतात. राजकीय गुंडाविरुद्ध तक्रारी न घेणे, गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ करणे, दाखल गुन्ह्यातून नाव कमी करणे व न्यायालयात राजकीय गुंड कसे सुटतील, याची खबरदारी घेतली जाते. गंभीर गुन्ह्यानंतरही अटक केली जात नाही.

### गतवर्षी पाच गुंड हद्दपार

सन २०२२मध्ये शहरातून केवळ पाच गुंडांना हद्दपार केले. शहरात काही झोपडपट्टी भागातील गुंडगिरीवगळता फारशी ती दिसत नाही. या किरकोळ गुंड व त्यांच्या गुंडगिरीलाही राजकारण्यांचा पाठिंबा असतो. कायदे - नियमांसह पोलिस यंत्रणेला खिशात ठेवून राजकारणासाठी उघडपणे गुंडगिरी सुरू असते. याला वेसण घालण्यात पोलिस कमी पडत आहेत.

कायदा - सुव्यवस्था राखणे व भयमुक्त समाज ही पोलिस व राजकारणी यांची प्रमुख जबाबदारी आहे. राजकीय गुन्हेगारी व पोलिसांचे संगनमत पाहता सर्वसामान्य माणसांना त्यांचे सामाजिक व व्यक्तिगत प्रश्न सोडवणे अशक्य झाले आहे. जागरूक नागरिकांनीही आवाज उठवला पाहिजे, अन्यथा लोकशाही धोक्यात येईल.

- ॲड. राजेंद्र नारवणकर, ज्येष्ठ वकील



6) लोकमत पृ: पान क्र. 3

# पोलिस आयुक्तालयात वाढले घरफोडीचे गुन्हे

## गुन्हे उघडकीचे प्रमाण अवघे ५५ टक्के

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत घरफोडीच्या गुन्ह्यात वाढ झाली आहे. २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये घरफोड्या वाढल्या आहेत. पोलिसांनी घरफोड्यांचे गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ५५ टक्के आहे. त्यामुळे घरफोड्यांना लगाम घालण्यासाठी पोलिसांना अधिक प्रयत्न करावे लागणार आहे. नागरिकांनाही त्यांची जबाबदारी दुर्लक्षून चालणार नाही.

मीरा-भाईंदर आणि वसई-विरार ही दोन वाढती शहरे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत आहेत. शहरातील दुकानदार, आस्थापना व नागरिकांना पोलिस सातत्याने आवाहन करून मौल्यवान वस्तू बँकेच्या लॉकरमध्ये सुरक्षित ठेवण्यास सांगतात. दुकान-आस्थापनेतील लॉक यंत्रणा अत्याधुनिक ठेवणे, लोखंडी जाळी लावणे, अलार्म यंत्रणा, सीसीटीव्ही बसवणे, सुरक्षारक्षक ठेवणे, आतील तिजोरी लोखंडी व मजबूत असणे, प्रवेशाचे अन्य मार्ग कडेकोट बंदिस्त ठेवणे आदी गोष्टी आवश्यक असतात. त्याबाबत वेळोवेळी पोलिस सूचना देत असतात.

### सीसीटीव्ही फुटेज, खबऱ्यांचा आधार

सीसीटीव्ही फुटेज घरफोड्यांना शोधण्यास महत्त्वाचे ठरत आहेत. तरी, पोलिसांना त्यांच्या खबऱ्यांचे नेटवर्क याकामी महत्त्वाचे ठरत आहे.

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत असलेल्या विविध पोलिस ठाण्यात २०२१ मध्ये घरफोडीचे ५१३ गुन्हे दाखल झाले होते, त्यापैकी २९३ गुन्हे पोलिसांना उघड झाले आहेत. २०२२ मध्ये घरफोडीचे गुन्हे वाढले आहेत. ५९६ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यापैकी ३१९ गुन्हे पोलिसांनी उघड झाले.

२०२१ व २०२२ या दोन वर्षांची आकडेवारी विचारात घेतल्यास घरफोडीचे एक हजार १०९ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यापैकी केवळ ६१२ गुन्हे पोलिसांना उघड केले आहेत.

CamScanner

CamScanner

दि. 23/01/2023

7) पुण्यनगरी पृ. पान क्र. 1

8) लोकमत पान क्र. 7

# भाईंदर येथे बांगलादेशीला अटक; पोलिसांची कारवाई

**मीरा रोड :** नवघर पोलीस ठाणे हद्दीतील भाईंदर पूर्वेच्या बी. पी. रोड या भागात पासपोर्ट, व्हिसाशिवाय बेकायदा राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकाला नवघर पोलिसांनी अटक केली आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिसांना बी. पी. रोड येथे एक बांगलादेशी कामानिमित्त येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस त्याठिकाणी गेले. तेथे संशयित व्यक्ती त्याठिकाणी असलेल्या कंपनीत येऊनमॅनेजरकडे कामाविषयी विचारपूस करत असताना दिसला. त्यावेळी व्यक्तीकडे चौकशी केली असता, त्याने अफजल बकर अली मंडल असे नाव सांगितले. तो बंगा संघा झोपडपट्टी, भाईंदर पूर्व येथे राहत असून, मूळचा बांगलादेशचा असल्याचे सांगितले.

तो कामासाठी भाईंदर येथे आला आहे. त्याच्याकडे भारतीय नागरिकत्व असल्याचे कोणतेही कागदपत्र नसल्याचे आढळून आले. अफजल बकरअली मंडल याने बांगलादेशी नागरिक असल्याचे स्वताहून कबूल केले. तो भारतात गेल्या सहा महिन्यांपासून राहत असल्याचे सांगितले. भारतात कोणत्या उद्देशाने, कोणत्या मार्गाने व कसा प्रवेश केला याबाबत विचारणा केली असता, त्या वेळी त्याने बांगलादेशमधील गरिबी, उपासमारी व बेरोजगारीला कंटाळून भारतात आला. भारताच्या सरहद्दीवरील गस्ती पथकाची नजर चुकवून इसामोती नदी पार करून हकिमपूर, पश्चिम बंगाल मार्गे हावडा येथून मुंबईत आल्याचे सांगितले. सहा महिन्यांपासून भाईंदर येथे राहत असून, मिळेल त्या कंपनीमध्ये मजुरीचे काम करून राहत असल्याचे सांगितले. पोलिसांनी या बांगलादेशी नागरिकाला ताब्यात घेतले.

# पोलिसांना शिवीगाळ अन् धक्काबुक्की

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** रविवारी पहाटेच्या सुमारास तुळींज पोलिस ठाण्यात चौघा आरोपींनी तीन अधिकारी व एका कर्मचाऱ्याला शिवीगाळ करत धक्काबुक्की व मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. तुळींज पोलिसांनी सरकारी कामात अडथळा निर्माण केला म्हणून चौघांवर गुन्हा दाखल करून दोन आरोपींना अटक केली आहे.

रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास तुळींज पोलिस ठाण्याबाहेर एका महिलेला आरोपी मोबीन मारहाण करत असताना सुरक्षा दलाचे जवान समजावण्यासाठी गेल्यावर आरोपीने धक्काबुक्की करत त्यांचा गळा धरला. पोलिस उपनिरीक्षक राम कुंडगीर हेदेखील समजावण्यासाठी गेल्यावर आरोपीने त्यांची कॉलर पकडून आरडाओरडा करत शिवीगाळ करत धक्काबुक्की केली.

ते त्याला पोलिस ठाण्यात समजावण्यासाठी घेऊन येत असताना आरोपीने त्यांच्या पोटात लाथ मारली. त्याचप्रमाणे पोलिस उपनिरीक्षक केंगार आणि सहायक पोलिस निरीक्षक थोरात यांनीही आरोपीला समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपी व त्याच्यासोबतच्या तीन महिला आरडाओरडा व शिवीगाळ करत अंगावर धावून आल्या. चारही आरोपींनी तुळींज पोलिस ठाण्यातील संगणक आणि की बोर्ड जमिनीवर आपटले. पोलिसांनी मोबिन, त्याची बहीण व आणखी दोन महिलांवर गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

CamScanner

# स्टेशन परिसर में जारी है फेरीवालों पर कार्रवाई

## स्थानीय व्यापारियों ने जताया पुलिस प्रशासन का आभार

■ **निसं, नालासोपारा:** नालासोपारा पूर्व स्टेशन परिसर और फ्लाईओवर ब्रिज के नीचे कब्जा जमाए बैठे हजारों अवैध फेरीवालों पर पुलिस की कार्रवाई जारी है। पुलिस प्रशासन की इस कार्रवाई का आम नागरिकों और स्थानीय व्यापारियों ने आभार जताया है। शनिवार को व्यापारी संगठन के पदाधिकारियों ने सीनियर पीआई शैलेंद्र नगरकर को सम्मानित किया। नालासोपारा में सड़कों पर अतिक्रमण से ट्रैफिक जाम की समस्या बढ़ रही थी। कई बार आपराधिक घटनाएं भी सामने आई है।



**नालासोपारा में बड़े पैमाने पर अतिक्रमण हुआ है। स्टेशन रोड और मुख्य सड़कों पर जबरन धंधा करनेवाले फेरीवालों को हटाती पुलिस।**

### फेरीवालों-रिक्शाचालकों की मनमानी

बता दें कि नालासोपारा स्टेशन रोड, तुलिंज रोड, सेंट्रल पार्क, आचोले रोड और फ्लाईओवर ब्रिज के नीचे फेरीवालों ने अतिक्रमण किया है। इसके साथ ही यहां सड़क पर ही ऑटोरिक्शा वाहन भी खड़े कर दिए जाते हैं। फेरीवाले और रिक्शाचालकों की मनमानी के कारण लोगों को पैदल चलना मुश्किल हो गया है। वाहनों के कारण लंबा ट्रैफिक जाम लग जाता है। भारी भीड़ के कारण चोरी, पॉकेट मारी, छेड़छाड़, मारपीट जैसी घटनाएं आम हो गई हैं।

### मनपा नहीं करती फेरीवालों पर कार्रवाई

पुलिस प्रशासन की ओर से मनपा आयुक्त अनिल कुमार पवार को फेरीवालों को हटाने के लिए कई बार पत्र दिया गया है, लेकिन मनपा प्रशासन कोई कार्रवाई नहीं करता। राजनीतिक पार्टियां और व्यापारी संगठन भी अवैध फेरीवालों को हटाने की मांग कर रहे हैं। मुख्य सड़कों पर अतिक्रमण को नहीं हटाए जाने से समस्या बढ़ रही है।

### पुलिस ने संभाला मोर्चा

तुलिंज पुलिस स्टेशन के सीनियर पीआई शैलेंद्र नगरकर ने कहा कि फेरीवालों पर कार्रवाई का अधिकार मनपा को है, लेकिन कोई कार्रवाई नहीं हो रही। फेरीवालों की मनमानी व दादागिरी की कई शिकायतें मिलती हैं। हमें कार्रवाई करनी पड़ती है। इस संबंध में जल्द ही मनपा आयुक्त से मुलाकात की जाएगी। ट्रैफिक जाम करनेवाले वाहन चालकों और फेरीवालों पर कार्रवाई जारी रहेगी।

CamScanner

पुढारी

# कुरव्यात गुन्हेगार गजाआड

## १९ वर्षांनंतर मुंबई खंडणीविरोधी पथकाची कारवाई

**ठाणे : पुढारी डेस्क**

तीन खून, जीवघेणे हल्ले, मारहाण, घातक शस्त्र बाळगणाऱ्या सराईत आरोपीला गजाआड करण्यात आले. सदर कारवाई मुंबई खंडणीविरोधी पथकाने केली. या आरोपीला पुढील तपासासाठी ताडदेव पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आल्याचे पोलीस सूत्रांनी दै. पुढारीला सांगितले.

विश्वास पाटील (५०) असे सराईत आरोपीचे नाव असून त्याने मुंबई शहरात दहशत पसरवण्यासाठी ९० च्या दशकात गुन्हे करण्याचा सपाटा लावला होता. गोरेगाव, आर. ए. के. मार्ग या पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३ जणांचा खून केला. तसेच घातक शस्त्र बाळगल्या प्रकरणी त्याच्यावर ताडदेव व लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाण्यात मोक्कांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. हत्यार बाळगल्याप्रकरणी १९९४ साली पाटील याला तत्कालीन पोलिसांनी बेड्या ठोकल्या. दरम्यानच्या काळात तो जामिनावर तुरुंगाबाहेर आला; मात्र न्यायालयीन तारखांना गैरहजर राहू लागला. त्यामुळे पाटील याला फरार घोषित तत्काळ अटक करण्याचे आदेश न्यायालयाने जारी केले. तेव्हापासून पाटील याचा शोध सुरू होता.

दरम्यानच्या काळात पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांनी फरार असलेल्या आरोपींना तुरुंगात धाडण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार प्रत्येक विभागाचे पोलीस आपापल्या परीने आरोपींचा शोध घेऊ लागले. अशाच प्रकारे ताडदेव पोलीस ठाण्याचे सपोनि शेळके, अंमलदार कालेल तांत्रिक माहितीच्या आधारे सराईत आरोपी विश्वास पाटील याचा शोध घेऊ लागले तर दुसरीकडे पाटील याने खून, जीवघेणे हल्ले व शस्त्र बाळगत असल्याने त्याचा शोध खंडणीविरोधी पथकदेखील घेऊ लागले. तपासादरम्यान खंडणीविरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक अरुण थोरात यांना पाटीलची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरणचे उपायुक्त प्रशांत कदम, वपोनि ज्ञानेश्वर गणोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि अरुण थोरात, हवालदार थोरात, अंमलदार कंद यांनी पायधुनी परिसरात सापळा लावून विश्वास पाटील याच्या मुसक्या आवळल्या. या आरोपीविरुद्ध ताडदेव, गोरेगाव, आर. ए. के मार्ग, पायधुनी, एम. आय. डी. सी. लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाण्यांमध्ये ९ गुन्हे दाखल असल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले आहे.



CamScanner

लोकमत

# वसईत मुन्नाभाई एमबीबीएस जोरात!

## १० वर्षांत केवळ ६२ बोगस डॉक्टरांवरच कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : कोणतीही पदवी नसताना केवळ बोगस प्रमाणपत्राच्या आधारे एखादे क्लिनिक उघडायचे, रुग्णांची दिशाभूल करायची आणि त्यांच्या आरोग्याशी खेळायचे, असा गोरख धंदा वसई-विरार शहर महापालिकेच्या हद्दीत जोमाने सुरू आहे. नालासोपारा, विरार, वसई, नायगाव या परिसरात मुन्नाभाई एमबीबीएस जोरात असल्याचे दिसून आले आहे. मनपाच्या आरोग्य विभागाने मागील दहा वर्षांत केवळ ६२ बोगस डॉक्टरांवर कारवाई केली आहे.

महापालिकेने दिलेली ही आकडेवारी समाधानकारक नसून पालिकेच्या सुस्त कारभारामुळे रुग्णांच्या आरोग्याशी खेळ मांडला जात असल्याचा आरोप केला जात आहे. वैद्यकशास्त्राचे ज्ञान नसल्याने रुग्णाचा आणीबाणीच्या प्रसंगात जीव जाऊ शकतो, त्याला जबाबदार कोण राहणार? हा प्रश्न उपस्थित राहतो.



कारवाई सुरु आहे. सध्या चौकशी सुरु आहे. लवकरच बोगस डॉक्टरांवर कारवाई केली जाणार आहे.

- आरोग्य विभाग, वसई-विरार पालिका

### तक्रार आली तर कारवाई

- बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यासाठी आरोग्य विभाग बऱ्याच मोहिमा घेतात. त्याबाबत बऱ्याच जणांना पूर्वकल्पना मिळाल्यावर ते सावध राहतात.
- धाड किंवा अनपेक्षित तपासणी केल्यास बोगस डॉक्टर हाती लागतात. त्यासाठी तक्रार दाखल होणे गरजेचे असते. ही तक्रार किंवा माहिती मिळाल्यावर कारवाई केली जाते.

वसईतील झोपडपट्टी परिसरात बोगस डॉक्टरांनी बनावट पदवीच्या आधारे आपली दुकाने थाटली आहेत. मात्र आरोग्य अधिकारी कारवाई करण्याचे धाडस दाखवित नाही. माफक फी आणि झटपट आराम हा फंडा अनेक डॉक्टर राबवित असल्यामुळे आदिवासी, गोरगरीब रुग्णांचा कल याच डॉक्टरांकडे असतो. थोडीफार गुंतवणूक करून हे बोगस डॉक्टर दवाखाने सुरू करून रुग्णांवर उपचार करतात. त्यांच्या आरोग्याशी हे डॉक्टर अक्षरशः खेळत आहेत. परवाना नसताना अशी दवाखाने थाटणाऱ्यांवर मनपा कोणतीही कारवाई का करत नाही, अशी टीका नागरिक करत आहे.



CamScanner

लोकमत

# महिलांनो, बाजारात जाताय? सौभाग्याचं लेणं सांभाळा!

## जास्त दागिने घालणे टाळावे : महिलांसह सर्वांनाच पोलिसांचे आवाहन

मंगेश कराळे


लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : सौभाग्याचं लेणं म्हणजे मंगळसूत्र. मंगळसूत्र हे बहुतांश महिलांच्या कायम गळ्यात असते. मात्र काही महिला या सोन्याचे आणि अधिक वजनाचे मंगळसूत्र घालून बाजारहाट करायला जातात. मात्र शहरातील विविध भागात चेन स्नॅचिंगच्या घटना घडत आहे. त्यामुळे दागिने घातल्यानंतर महिलांनी सावध राहणे आवश्यक आहे. परिणामी महिलांच्या सुरक्षिततेवर प्रश्न निर्माण होत आहेत. मागील घटनांचा आढावा घेतल्यास मंगळसूत्र हिसकावण्याच्या काही तुरळक घटना घडल्या आहेत. त्या होऊ नयेत म्हणून महिलांनीही सावध राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

महिलांनी स्वतःच जागरूक राहून आपल्या अंगावरील सर्व प्रकारच्या सोन्याच्या दागिन्यांची काळजी घेण्याची गरज आहे. दोन ते तीन मिनिटांत लाखाची कमाई होत असल्याने चेन स्नॅचिंगच्या घटनांमध्ये वाढ होत चालली आहे.



### कोणत्या वर्षात किती चेन स्नॅचिंगच्या घटना?




### धूम स्टाइलने दुचाकी चालवून अनेक गुन्हे

बहुतेक संशयित चोरटे निर्जन रस्त्यावर चालणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, महिलांना लक्ष्य बनवण्याच्या एकाच पद्धतीचा अवलंब करीत असल्याचे अनेक गुन्ह्यात उघडकीस आले आहे. धूम स्टाइलने दुचाकी चालवत महिलेच्या किंवा तरुणींच्या गळ्यातून सोन्याची चेन किंवा दागिने खेचून पळून जाण्याचे अनेक गुन्हे घडले आहेत.

### चोरांचा फंडा लक्षात घ्या

महिलांनी जास्त दागिने घालण्याचे टाळावे. घातल्यास पाठलाग होण्याविषयी सावध राहावे. गळ्यातील दागिन्यांना पीन लावा, जेणेकरून ते तुटणार नाहीत. चेन स्नॅचिंग घडल्यास पोलिसांना तत्काळ माहिती द्यायला पाहिजे. पत्ता विचारण्याचा बहाणा करून दागिने हिसकावण्याचा चोरांचा फंडा आहे त्यामुळे महिलांनी सावध राहावे

### मंगळसूत्र चोरीस गेले ते गेलेच



मी रात्रीच्या वेळी परिवारासह आइस्क्रीम खाण्यासाठी दुकानावर गेले होते. घरी परतत असताना भरधाव दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांपैकी एकाने माझ्या गळ्यातून सोन्याचे मंगळसूत्र खेचून नेले. याबाबत पोलिस ठाण्यात तक्रार केली; पण अद्यापपर्यंत चोरही सापडला नाही व मंगळसूत्रही मिळाले नाही.

-पीडित महिला, नालासोपारा

### तत्काळ पोलिसांना कळवा

मॉर्निंग वॉकला किंवा बाजारात जाणाऱ्या महिलांनी किंवा तरुणींनी कमीतकमी दागिन्यांचा वापर करावा. तसेच गळ्यामध्ये शाल, मफलर किंवा ओढणी ठेवल्यास चेन स्नॅचिंग रोखता येऊ शकते व हा सर्वोत्तम पर्याय आहे. घटना घडल्यास तत्काळ ११२ नंबर, स्थानिक पोलिस ठाण्यात येऊन किंवा त्यांच्या मोबाइलवर त्वरित संपर्क करावा, जेणेकरून नाकाबंदी किंवा पुढील पोलिस ठाण्याला माहिती देता येईल.

- पोलिस प्रशास

Hello Vasai
Page No. 4 Jan 23, 2023
Powered by: erelego.com

CamScanner